**प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा जबाब**

मी सत्य प्रतिज्ञेवर निवेदन करतो की,

साक्षीदाराचे नांव : शफाकतअली ताहेरअली देशमुख

वय वर्षे : ५० वर्षे कामधंदा : ठेकेदार

राहणार : वढाळी देखमुख, ता. अकोट, जि. अकोला.

**पुढील सरतपास प्रतिवादी तर्फे वकील श्री. जी.पी.गुहे यांचेकडून शपथेवर सुरुः–**

आता मला दुकान व आस्थापना नोंदणी प्रमाणपत्राची सत्य प्रत दाखविण्यात आली. त्याची मुळ प्रत मी आज रोजी सोबत आणले आहे. त्यातील मजकुर मुळ प्रती प्रमाणे खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. ३२** देण्यात येत आहे. आता मला जिल्हा परिषद कडील बांधकाम ठेकेदार बाबतचे नोंदणी प्रमाणपत्राची सत्य प्रत दाखविण्यात आली. त्याची मुळ प्रत मी आज रोजी सोबत आणलेली आहे. त्यातील मजकुर मुळ प्रती प्रमाणे खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. ३३** देण्यात येत आहे. आता मला माझ्या खात्याचे चेकबुक मधील अभिलेख पर्ची मुळे प्रत दाखविण्यात आली. त्यातील लिखाण माझ्या हस्ताक्षरातील आहे. त्यातील नोंदी मी दैनंदिन व्यवहाराच्या वेळी लिहलेले आहे.

यावेळी वादी यांच्या विधिज्ञांनी असा आक्षेप घेतला आहे की, सदर नांदी प्रतिवादीने स्वतः केलेल्या असलयाचे सांगत आहे. सदर नोंदी बरोबर आहेत किंवा नाही याची खातरजमा बॅकेकडून केली जात नाही तो पर्यत त्या निशाणी देता येणार नाही. त्यावर वादी यांच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, सदर चेकबुक बॅकेने प्रतिवादीला दिले आहे. ते मुळ कागदपत्र आहे. त्यावर प्रतिवादीचे हस्ताक्षर आहे त्यामुळे त्यास निशाणी देण्यात यावी.

**आदेशः–** अभिलेखावरील पुरावा व कागदपत्राचे अवलोकन केले वादातील कागदपत्रे ही धनादेश पुस्तीके मधील धनादेश कोणाला दिला त्याची नोंद ठेवण्या बाबतचा आहे.

साक्षीदार याच्या पुराव्यातुन त्याने सदर नोंदी दैनंदिन व्यवहारा मध्ये स्वतःच्या हस्ताक्षरात केले असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे भारतीय पुरावा कायदा कलम ३२–२ अन्वये सदर कागदपत्र हे खटल्याशी संबंधित असल्याचे स्पष्ट होते. तसेच त्यास दुजोरा देणारा पुरावा बॅकेच्या नोंदी अभिलेखावर सादर करावयाचे किंवा नाही ही बाब प्रतिवादीच्या अखत्यारीतील आहे. पुढील पुराव्या करीता सध्याच्या पुराव्या कडे दुर्लक्ष करता येणार नाही. त्यामुळे सदर कागदपत्रास **नि.क्र. ३४** देण्यात येत आहे.

२. आता मला माझ्या खात्याचा खातेउतारा दाखविण्यात आला. परंतु, सदर खातेउता–यावर बॅकेचा सही शिक्का नाही तसेच त्यावर डीजीटल सही देखिल नाही त्यामुळे सदर कागदपत्र पुराव्यात विचारात घेता येणार नाही. आता मला मौजे चंडीकापुर येथे काम केल्या बाबत जे परागमन पास देण्यात आले होते त्यांच्या मुळ प्रती मी अभिलेखावर हजर केल्या आहेत. त्यांना अनुक्रमे **नि.क्र. ३५ ते ५३** देण्यात येत आहे. आता मला बॅकेकडे दि. ३०/११/२०२१ रोजी चेक रद्द होण्या बाबत केलेला अर्जाची स्थळ प्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. ५४** देण्यात येत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास वादीतर्फे श्री. जी.के.टिकार यांच्या तर्फे सुरुः–**

३. हे म्हणणे खरे आहे की, मी सागर श्रीकृष्ण वाघमारे, रा. अकोली जहांगीर यांना ओळखतो, ते बांधकाम ठेकेदार आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी मला सन २०२०–२१ मध्ये त्यांनी मला चंडीकापुर येथे ग्राम पंचायत बांधकाम करण्याचे कंत्राट दिले होते. ग्राम पंचायतीने कंत्राट माझ्या नावावर दिल्याचे कागदपत्र नाही. हे म्हणणे खरे आहे की,

सागर श्रीकृष्ण वाघमारे याने सन २०२०–२१ मध्ये चंडीकापुर ग्रामपंचायत येथिल दलीत वस्ती मध्ये सिमेंट रोड बांधकामाचे कंत्राट घेतले होते व नंतर त्याने मला दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला कंत्राट सागर वाघमारे याने न देता ग्रामपंचायतीने दिले होते असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याचे काम करण्यासाठी मला खडी, रेती व सिमेंट बाहेरुन खरेदी करुन करावे लागत होते. हे म्हणणे खरे आहे की, वादी हा माझ्या मौहल्यातील रहीवाशी असुन तो देखिल बांधकाम ठेकेदार व बांधकाम साहित्य पुरवठा करणारे आहे.

४. हे म्हणणे खरे आहे की, माझे वादी सोबत सन २०२०–२१ मध्ये मैत्रीचे संबंध होते व आज देखिल आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रामधील परिच्छेद क्र. २ मधील ओळ क्र. २ ते ५ मध्ये नमुद कामाच्या वेळी वादीचा व माझा व्यवहार झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, दि. २३/०९/२०२१ पासुन वादीने मला प्रति ब्रास रु. पाच हजार प्रमाणे रेती पुरविली होती व त्याची एकुण रु. १,०५,०००/– होत होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. २३/०९/२०२१ रोजी वादीने मला १० क्वींटल बांधकाम स्टील दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. २४/०९/२०२१ रोजी वादीने मला १३ ब्रास मुरुम दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, असे सर्व मिळुन वादीचे माझ्या कडे रु. २,६४,०००/– येणे बाकी होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या रक्कमेचे परतफेड पोटी दि. २६/०९/२०२१ रोजी जिल्हा मध्यवर्ती बॅकेचा धनादेश दिला होता.

**प्रश्नः–** तुम्ही धनादेश क्र. १३७ हे वटु नये असा अर्ज बॅकेकडे दिल्या मुळे तो दि. ०६/१२/२०२१ रोजी अनादर झाला होता ?

**उत्तरः–** मी कोरा धनादेश दिला होता.

५. मी मागील १८ वर्षा पासुन व्यवहार करीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, व्यवहारा मध्ये धनादेश देताना त्यावर तारीख, रक्कम टाकुन सही करुन दिला जातो. हे म्हणणे खरे नाही की, दि. २६/०९/२०२१ रोजीचा धनादेश मी तारीख, रक्कम टाकुन सही करुन दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, धनादेश पुस्तीके सोबत क्वाउंटर स्लीप असते व ती धनादेश देणा–या कडे असते. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.क्र. ३४ सोबतची क्वांउंटर स्लीप काढुन टाकली आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ३४ वर अनुक्रमांक २ वर रविन्द्र देशमुख असे नाव नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की, रवि मामा नाव आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ३४ वरील दस्त मी खोटा व बनावट तयार केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीने मला धनादेश अनादर झाल्या बाबत दि. ०८/१२/२०२१ रोजी रक्कम मागण्याची नोटीस पाठविली होती, ती मला प्राप्त झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी त्याचे उत्तर दिलेले नाही. मी वादीला नोटीस देवुन रक्कम दिली आहे असे कळविले नव्हते. मी बॅकेमध्ये दि. ३०/११/२०२१ रोजी धनादेश न वटविण्या बाबत जो अर्ज दिला होता त्याची नोटीस वादीला दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, वादीने मला नोटीस दिल्या नंतर मी त्याला वारंवार फौजदारी खटला दाखल न करण्याची विनंती केली होती व नंतर रक्कम अदा करणार असल्याचे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या विनंती वरुन वादीने माझ्या वर धनादेश अनादर झाल्याचा खटला दाखल केला नव्हता.

६. हे म्हणणे खरे आहे की, वादीने मला रक्कम मागणी करीता दि. २२/०८/२०२२ रोजी नोटीस पाठविली होती. मी त्यास नोटीस उत्तर दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या कडे वादीचे रु. २,६४,०००/– येणे बाकी आहे.

यावेळी वादीच्या विधिज्ञांनी पुढील उलटतपास पुढील तारखे पर्यंत तहकुब करण्याची विनंती केली. त्यावेळी साक्षीदार याने देखिल थोडा वेळ विश्रांती घेण्याची मागणी

केली. त्याचा विचार करता पुढील उलटतपास पुढील तारखे पर्यंत तहकुब.

समक्ष

(ए.एच.शेख)

सह दिवाणी न्यायाधिश

(क–स्तर) अकोट

दिनांकः– १०/०२/२०२६

श्रवणोत्तर स्विकृत

(ए.एच.शेख)

सह दिवाणी न्यायाधिश

(क–स्तर) अकोट